महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
(A Govt. of Maharashtra Undertaking)
CIN : U40109MH2005SGC153645

दूरध्वनी क्र. २६४७२१३१ / २६४७४२११
फॅक्स नं. : ०२२-२६५८१०८३
Email : ciro@mahadiscom.in
Websitee : www.mahadiscom.in

औद्योगिक संबंध विभाग, प्रकाशगड,
प्लॉट जी - ९, प्रकाशगड, ४ था मजला,
प्रा. अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई - ५१.

जा. क्र. : औसंवि/ब/ककनिस/६१वी बैठक/ No - 0923 दिनांक : 12 JAN 2017

# परिपत्रक

विषय : म.रा.वि.मं. कर्मचारी कल्याण निधी समितीच्या ६१ व्या बैठकीत घेण्यात आलेले निर्णय.

********

महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ कर्मचारी कल्याण निधी समितीची ६१ वी बैठक दि. ०४/१०/२०१६ रोजी प्रकाशगड, वांद्रे (पूर्व), मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात आलेले आहेत.

१. म.रा. वि.मं. सुत्रधारी कंपनी अंतर्गत तिन्ही कंपन्यांतील कर्मचारी व त्यांच्यावर अवलंबित ०५ सदस्यीय कुटूंबियांसाठी MSEB HCL Group Mediclaim Policy सुरु करण्यात आलेली आहे. सदर मेडीक्लेम पॉलिसीमध्ये सर्वाधिक आजारांचा समावेश असल्यामुळे ज्या आजारांचा समावेश सदर मेडीक्लेम पॉलिसीमध्ये नाही अशा आजारांचा म.रा.वि.मं. कर्मचारी कल्याण निधीतंर्गत अवलंबितांकरीता असलेल्या आजारांच्या यादीमध्ये फक्त १) Circumecision (रु. १०,०००/-) व २) Tetanus (रु. १०,०००/- गंभीर स्वरुपाचा असल्यास रु.२०,०००/-) या नवीन आजारांचा समावेश करण्यात आलेला आहे.
२. म.रा. वि.मं. कर्मचारी कल्याण निधी अंतर्गत विविध योजनांच्या लाभाकरीता महिला कर्मचारी यांच्या प्राप्त होणाऱ्या प्रस्तावात लग्नापूर्वीच्या व लग्नानंतरच्या नावांत तफावत असल्याने नावातील बदलाबाबत राज्य शासनाचे राजपत्र किंवा विवाह प्रमाणपत्र प्रस्तावासोबत सादर करणे गरजेचे राहील.
३. म.रा. वि.मं. कर्मचारी कल्याण निधीमधून कर्मचाऱ्यांच्या अवलंबित पाल्यांना शिष्यवृत्ती देण्यात येते. मयत कर्मचाऱ्यांचे अवलंबित वारसांना म.रा.वि.मं. कर्मचारी कल्याण निधीमधून शिष्यवृत्ती देता येणार नाही.
४. वीज सेवक, लेखा सहाय्यक, कनिष्ठ सहाय्यक, विद्युत सहाय्यक व उपकेंद्र सहाय्यक यांना म.रा. वि.मं. कर्मचारी कल्याण निधीमार्फत लाभ मिळण्याचा दिनांक हा **प्रशासकिय परिपत्रक क्र. ५३१, दि. २२/०२/२०१६** प्रसारित झाल्याच्या तारखेपासून म्हणजेच कर्मचाऱ्याच्या मानधनातून म.रा. वि.मं.कर्मचारी कल्याण निधीची मासिक वर्गणी रु. १०/- ची कपात माहे फेब्रुवारी २०१६ पासून करण्यात आलेली असल्यामुळे, फेब्रुवारी २०१६ पासून कर्मचाऱ्याचे अवलंबित रुग्णालयात दाखल झाल्यास, मुलगी जन्मल्यास अथवा इतर योजनांचा लाभ देण्यात येईल,

सदर परिपत्रक महावितरण कंपनीच्या RAPDRP-Infoportal-(Circular-I.R. Dept.) येथे उपलब्ध असून त्याची मुद्रांकित प्रत प्रसारित करण्यात येणार नाही.

(संजय ढोके)
मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी (प्रभारी)

प्रत सविनय सादर :
१. संचालक (वित्त), म.रा.वि.मं. सुत्रधारी कं. मर्या., हाँगकाँग बँक इमारत, फोर्ट, मुंबई.
२. कार्यकारी संचालक (मासं), महावितरण/ महानिर्मिती / महापारेषण, मुंबई.

प्रत सस्नेह सादर :
मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी, महानिर्मिती / महापारेषण, मुंबई.